# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक** :– क्र.सीटीएयु/२८/२०२१–२०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापकशास्त्र, नृत्यशास्त्र, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र या महाविद्यालयांचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र.बैठक– २०२०/प्र.क्र.५३/२०/विशि–१ दिनांक २९/१०/२०२१ अन्वये दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्तीचे लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापकशास्त्र, नृत्यशास्त्र, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र या तसेच महाविद्यालयांचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की उपरोक्त शासन निर्णयास व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २४ जानेवारी, २०२२, रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने महाविद्यालयास कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयान्वये "दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरू ठेवण्यात आलेल्या असल्याने अशा अध्यापकांना त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राहय धरून तत्कालीन प्रचलित धोरणानुसार सेवानिवृत्ती वेतन देय राहील" अशा अध्यापकांचे प्रस्ताव मान्यतेसाठी लवकरात लवकर विभागास पाठवावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेत क्रमांक २०२११०२९१७४३०७१२०८ या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ९ मार्च, २०२२

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापकशास्त्र, नृत्यशास्त्र, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र या महाविद्यालयांचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. अजित बाविस्कर, उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई—४०० ०३२.
२. मा. डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११ ००१.
३. मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
४. मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड — ४१० २०६.
५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ,
मुंबई — ४०० ०९८.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).
१०. सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ कार्यवाही अहवालाकरीता.